# मेट्रो ३ साठी कॉर्पोरेशनला सोशल मीडियाचा आधार

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

मेट्रो ३ प्रकल्पासंदर्भात मुंबईकरांना व्यवस्थित माहिती मिळावी, त्यांचे प्रश्न तसेच शंकांचे निरसन करण्यासाठी 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन'ने आता सोशल मीडियाच्या माध्यमातून आघाडी उघडण्याचे ठरवले आहे. फेसबुक, ट्विटर, आणि युट्यूबद्वारे कॉर्पोरेशन लोकांना सामोरे जाणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ प्रकल्पाची कार्यवाही सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, या मार्गासाठी काळबादेवी आणि गिरगावमधील लोकांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. पुनर्वसनाच्या पर्यायांबाबत स्थानिकांचे अजूनही समाधान झालेले नाही. याच मुद्द्यावर या भागात आंदोलने झाली होती, 'गिरगाव बंद'ही पुकारण्यात आला होता.

वास्तविक पाहता या प्रकल्पाविषयी स्थानिकांचे शंकानिरसन करण्यासाठी कॉर्पोरेशनने अनेक बैठका घेतल्या, रहिवाशांशी चर्चा केली. परंतु, त्यांचे समाधान झालेले नाही. पुनर्वसनासोबतच मेट्रो कारशेडसाठी आरे कॉलनीतील दोन हजाराहून झाडे कापण्याच्या प्रस्तावावरूनही मुंबईकरांच्या विरोधाचा सामना करावा लागत आहे. विरोधाची तीव्रता लक्षात घेता, अखेर राज्य सरकारनेच याविषयी निर्णय घेण्यासाठी समितीची स्थापना केली आहे.

या पार्श्वभूमीवर लोकांचे शंकानिरसन करण्यासाठी कॉर्पोरेशनने सोशल मीडियाचा आधार घेण्याचे ठरवले आहे. फेसबुक, ट्विटर आणि युट्यूबच्या माध्यमातून प्रकल्पाची रूपरेषा मुंबईकरांना समजावून सांगण्याचा प्रयत्न याद्वारे होणार आहे. तसेच या प्रकल्पाबाबत कुणाच्या काही शंका असल्या, तर त्यांचेही निरसन केले जाईल.

## मेट्रो ३साठी चार परदेशी सल्लागार



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गासाठी हाँगकाँगच्या मे. ऐकॉम कंपनीच्या नेतृत्वाखाली चार परदेशी सल्लागार कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कंत्राटदारांची नियुक्ती करणे, आराखड्यांची तपासणी करणे, ट्रॅकचे काम, रेल्वे गाड्या, सुरक्षा दर्जा आणि विविध बाबींमध्ये सल्लागार सहकार्य करतील. मेट्रो ३ प्रकल्पासाठी जपानच्या 'जायका' या वित्तसंस्थेकडून अर्थसाह्य घेताना अशा प्रकारच्या सल्लागारांची नेमणूक करण्याचे ठरवण्यात आले होते. मेट्रोच्या बांधकामासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने काढलेल्याल टेंडरला दोनच दिवसांपूर्वी देश-विदेशातील मिळून नऊ कंपन्यांनी प्रतिसाद दिला होता. त्यानंतर लगेचच सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली आहे. हाँगकाँगची मे. ऐकॉमच्या नेतृत्वाखाली अमेरिका, जपान आणि फ्रान्सच्या सल्लागार कंपन्या काम करतील.